शैक्षणिक वर्ष २०१८-१९ :
नवीन महाविद्यालयांना मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक: १५ जून, २०१८.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२९/१७)/मशि-४, दि. १५.०९.२०१७.
२) शासन निर्णय क्र. मान्यता-२०१८/(३०/१८)/मशि-४, दि. २८.०२.२०१८

## शासन आदेश

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ अणि संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी शासनास शिफारशीत केलेल्या नवीन महाविद्यालयांना मान्यता देण्यासंदर्भात संदर्भ क्र. २ येथील शासन आदेशान्वये इरादापत्रे देण्यात आलेली आहेत. आता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (च) अन्वये विहीत केल्यानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठांनी अनुपालन अहवाल सकारात्मक शिफारशीसह शासनास सादर केले आहेत. सदर अनुपालन अहवालासोबतचे प्रस्ताव संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयामधील परिशिष्ट "क" अन्वये विहित निकषांप्रमाणे तपासले असता जे प्रस्ताव निकषांची पुर्तता करीत आहेत अशा प्रस्तावांना, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (छ) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार पुढील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे नवीन महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | मुंबई विद्यापीठ, मुंबई | |
| १. | १ | नॅशनल कन्नडा एज्यूकेशन सोसायटीचे, एन.के.ई.एस. कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स इंदूलाल डी. भुवा मार्ग, वडाळा (प.), मुंबई - ३१ | बी.एम.एम. (०-६०)<br>बी. कॉम. (०-१२०)<br>बी.कॉम. (अकांऊटींग अॅण्ड फायनान्स) (०-६०)<br>बी.एम.एस. (०-६०) |

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ७. | ७ | निरंजनलाल दाल्मिया एज्यूकेशनल सोसायटीचे, एन.एल.दाल्मिया कॉलेज, सृष्टी सेक्टर १, मीरा रोड, जि.ठाणे - ४०१ १०४ | बी.ए. (०-१२०)<br>बी.कॉम. (०-१२०)<br>बी.एस्सी. (०-१२०) |
| ८. | ८ | साई सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे, श्री इंद्रपाल बाबुराव चौधुले विधी महाविद्यालय मु. राहनाळ, अंजूरफाटा, ता. भिवंडी, जि. ठाणे - ४२१ ३०२ | १)विधी-बॅचलर ऑफ लॉ (एल.एल.बी.) (तीन वर्ष) (०-६०)<br>२)विधी - बॅचलर ऑफ लॉ (एल.एल.बी.) (पाच वर्ष) (०-६०) |
| ९. | ९ | जीवनदिप शैक्षणिक संस्थेचे, जीवनदीप विधी महाविद्यालय मु. गोवेली, पो. रायते, ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१ १०३. | १)विधी-बॅचलर ऑफ लॉ (एल.एल.बी.) (तीन वर्ष) (०-६०) |
| १०. | १० | तुलसी शिक्षण प्रसारक मंडळाचे, भिवंडी महिला महाविद्यालय भिवंडी आग्रा रोड, ता. भिवंडी, जि. ठाणे- ४२१ ३०८ | बी.ए. (०-१२०)<br>बी.कॉम. (०-१२०) |
| ११. | ११ | ॲग्नेल चॅरीटीजचे, ॲग्नेल स्कुल ऑफ लॉ ॲग्नेल टेक्निकल एज्यूकेशन कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ५४,६०,६२,६६, सेक्टर ९ अ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३ | विधी (३ वर्षे) (०-६०)<br>विधी (५ वर्षे) (०-६०) |
| १२. | १२ | आयडियल फाउंडेशनचे, आयडियल कॉलेज ऑफ लॉ मु. पो. पोशेरी, ता. वाडा, जि. पालघर - ४२१ ३०३ | १)विधी - बॅचलर ऑफ लॉ (एल.एल.बी.) (तीन वर्ष) (०-६०)<br>२)विधी - बॅचलर ऑफ लॉ (एल.एल.बी.) (पाच वर्ष) (०-६०) |
| १३. | १३ | लवेल विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे, कै. पद्मश्री श्री.म.तथा अण्णासाहेब बेहरे इन्स्टिट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, मु.पो.लवेल, ता.खेड, जि.रत्नागिरी - ४१५ ७०८ | बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) (०-६०) |
| १४. | १४ | श्रीराम एज्यूकेशन सोसायटीचे, श्री.आनंदराव पवार कला, वाणिज्य, शास्त्र महाविद्यालय कांगणेवाडी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी - ४१५ ६०५ | १)कला - बॅचलर ऑफ आर्टस (बी.ए.) (०-१२०)<br>२)वाणिज्य - बॅचलर ऑफ कॉमर्स (बी.कॉम.) (कॉमर्स) (०-१२०)<br>३)विज्ञान - बॅचलर ऑफ सायन्स (बी.एस्सी.) (०-१२०) |

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | | | |
| ५८. | १ | विद्याप्रबोधीनी बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे, सेंट्रल प्रोव्हिंशनल आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स महिला महाविद्यालय, रींग रोड, नागपूर | १) कला. - १२० (माध्यम-मराठी) - २ अनिवार्य भाषा व ४ ऐच्छिक विषयासह<br>२)वाणिज्य-१२०(माध्यम-इंग्रजी)- AS PER SYLLABUS<br>३)विज्ञान-१२० (माध्यम - इंग्रजी) - २ अनिवार्य भाषा व ५ ऐच्छिक विषयासह |
| ५९. | २ | स्वर्गीय मधुकरराव देशमुख शिक्षण संस्थेचे, अवधूत महिला महाविद्यालय, कुही, मौजा भोजापुर कुही- अकोली रोड ता. कुही, जिल्हा-नागपूर | १)विज्ञान-१२० (माध्यम - इंग्रजी) - २ अनिवार्य भाषा व ५ ऐच्छिक विषयासह<br>२)वाणिज्य-१२०(माध्यम-इंग्रजी)-AS PER SYLLABUS |
| ६०. | ३ | सरस्वती बहुउद्देशीय एज्यूकेशन सोसायटीचे, सरस्वती महिला महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान), नाईक ले-आऊट सावनेर जि. नागपूर | १) कला -१२० (माध्यम - मराठी) - २ अनिवार्य भाषा व ४ ऐच्छिक विषयांसह<br>२)विज्ञान-१२०(माध्यम-इंग्रजी)-२ अनिवार्य भाषा व ५ ऐच्छिक विषयासह<br>३)वाणिज्य-१२०(माध्यम-मराठी) AS PER SYLLABUS |
| ६१. | ४ | विद्या विकास शिक्षण संस्थेचे, मातोश्री आशाताई कुणावार आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स महिला महाविद्यालय हिंगणघाट, संत तुकडोजी वार्ड, नंदोरी रोड, हिंगणघाट जि. वर्धा | १)कला.-१२०(माध्यम - मराठी) - २ अनिवार्य भाषा व ४ ऐच्छिक विषयांसह<br>२)वाणिज्य.-१२० (माध्यम-इंग्रजी) AS PER SYLLABUS<br>३)विज्ञान.-१२० (माध्यम-इंग्रजी) - २ अनिवार्य भाषा व ५ ऐच्छिक विषयांसह |
| ६२. | ५ | ग्राम विकास शिक्षण संस्थेचे, एम.जे.एम.महाविद्यालय मु.पो.पुलगाव, ता. देवळी, जि.वर्धा | विज्ञान व तंत्रज्ञान - विज्ञान., १२० विद्यार्थी (माध्यम - इंग्रजी) |

२. अटी व शर्ती :-

१. सदर महाविद्यालयाची मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२. नवीन महाविद्यालय/संस्थेने त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत, असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

३. महाविद्यालयाने/संस्थेने हमीपत्र सादर केल्याशिवाय आणि तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

४. महाविद्यालयाने, संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. ३ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

५. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज) रेग्युलेशन, २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करु नये.

७. मंजूर करण्यात आलेल्या महाविद्यालयाने सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या कालमर्यादेत नॅक मुल्यांकन करुन घेण्यासाठी प्रयत्न करावा व याबाबत पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील.

८. लिगल एज्युकेशन अधिनियम, २००८ व तद्नुषंगिक नियमांतील तरतूदीनुसार मान्यताप्राप्त नवीन महाविद्यालयाने बार कौन्सिल ऑफ इंडियाची (B.C.I.) प्रकरणपरत्वे मान्यता/संलग्निकरण घेण्याची कार्यवाही विहीत कालावधीत करावी.

९. ज्या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे आवश्यक आहे. संलग्निकरण किंवा इतर शिखर संस्था/केंद्रीय नियामक मंडळे यांची परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे जर महाविद्यालय त्या शैक्षणिक वर्षात सुरु होऊ शकले नाही तर, त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. संबंधित विद्यापीठाने संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करण्यापूर्वी शासन मान्यता आदेशांचे अवलोकन केल्याशिवाय व संबंधित विभागीय सहसंचालकाचे अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

४. संबंधित विद्यापीठाने व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या नवीन महाविद्यालयांचा नियतकालिक आढावा घेऊन सदर महाविद्यालयांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर महाविद्यालयांची मान्यता रद्द समजून तसे शासन व

विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व २४४८/२०१३ मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी सवंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(द. व. खारके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
६) निवडनस्ती (मशि-४)